Court.

FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0167730

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. 03, वर्ष 2020 दिनांक 25/03/2020
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act म.प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7, 7(अ)
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून 26/03/2020 वेळ 20:15 तारीख पर्यंत 24/03/2020 ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 26/03/2020...., वेळ........
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 04, तारीख 25/03/2020 वेळ 06:00
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी.

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chowki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव धारावी पोलिस ठाणे, मुंबई, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव अब्दुल साबीर अब्दुल हकीम शाह (b) वडिलांचे / पतीचे नाव अब्दुल हकीम शाह
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 32 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8169800652
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय इस्टेट एजंट
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता ........, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : 302, मदिना अपार्टमेंट, [illegible] काल्हेर रोड, कौसा मुंब्रा, जि. ठाणे
Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ठाणे, राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

लोकसेवक पोलिस कर्मचारी संजय अंकुश तळेकर, संदिप गणेश राणे, मुकुंद गजानन थोरे नेमणूक - धारावी पोलिस ठाणे, मुंबई. खाजगी इसम - युनिस [illegible] मेहेर



Scanned by CamScanner

खालील फिर्यादी डॉ. अब्दुल साबिर अब्दुल रहीम शाह, वय 32 वर्षे रा.ठि: १०2, मदिना अपार्टमेंट, किस्मत कॉलनी रोड, कौसा मुंब्रा, जि. ठाणे यांच्या स्वतंत्र कागदावर सविस्तर जबाब नोंद करण्यात आला असून, तोच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

(शैलेंद्र [illegible])
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

Scanned by CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ....... तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....... —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ....... —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आलोसे संदिप राणे, सपोउ तळेकर [illegible] यांनी फिर्यादी यांना गाळ्यात गाळीव खाद्यपदार्थ विक्री चा धंदा सुरु करण्याकरिता व त्यावर आलोसे यांनी कायदेशीर कारवाई न करण्याकरिता रु.२५०००/- इतक्या रकमेची कायदेशीर परिश्रमिकेव्यतिरिक्त स्वतः करिता मागणी करून ती स्वाक्षी रक्कम [illegible] [illegible] यांच्या मार्फतीने स्विकारल्याने [illegible] [illegible] गुन्हा कलम ७, ७(अ) भ्र.प्र.अधि.१९८८ मध्ये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. शैलेंद्र चव्हाण

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......., जिल्हा ......., राज्य .......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......................... (3) Transferred to P. S. .......................... District.......................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name शैलेंद्र शिवराम चव्हाण
पदनाम Rank पो.नि. ला.प्र.वि. मुंबई.
तपासिक अं. चा कोड क्र. .......
Posting
Code No. of I. O. .......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.....१८\०९\2020
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

जबाब दि. १८/०१/२०२०.

श्री. अब्दुल साबीर अब्दुल हकीम शाह, वय ३२ वर्षे, व्यवसाय – इस्टेट एजंट, राहणार– रूम न १०२, ए विंग, मदिना अपार्टमेन्ट, किस्मत कॉलनी रोड, कौसा, मुंब्रा. जि.ठाणे.

....

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी राहावयास आहे. माझा मुंब्रा येथे इस्टेट एंजट (जमीन/घर खरेदी/विक्री) चा व्यवसाय आहे. त्यावर माझे कुटूंबियाचा उदरनिर्वाह चालतो.

मी करीत असलेल्या इस्टेट एंजटच्या मार्केटमध्ये मंदी असल्याने जोडधंदा म्हणून धारावी पोलीस ठाणे हद्दीत ९० फिट रोड मुंबई येथे रस्त्याचे कडेला गाडीवर बिर्याणी, पुलाव, सिक कबाब नवीन विक्रीचा धंदा सुरू केला. दिनांक १३/०१/२०२० रोजी मी बिर्याणी/पुलाव/सिक कबाब ची गाडी ९० फिट रोड, धारावी येथे लावली होती. तेव्हा एका फेरीवाल्याने मला सांगितले की, धारावी पोलीस ठाणे मध्ये कोणी राणे साहेब ने भेटायला बोलावले आहे. म्हणुन मी १४/०१/२०२० रोजी रात्री २०:३० वा.चे सुमारास धारावी पोलीस ठाणे येथे गेलो त्यावेळी तेथे मला पोलीस संदिप राणे भेटले. त्यांना मी माझे धंदयाबद्दल सांगितले. त्यांनी मला सिनीअर इंस्पेक्टर साहेबांच्या कॅबिनच्या बाजुच्या कॅबिन मध्ये दुसरे पोलीस संजय नावाची व्यक्ती बसली होती त्यांची भेट घालून दिली. त्यांनतर संजय ने सिनीअर इन्स्पेक्टर चे ऑर्डली मुंकूद ला बोलाविले आणि माझी ओळख करून दिली. तेव्हा मुंकुद याने मला "किती पैसे देणार" असे विचारले. त्यावर मी मुंकूद यास "माझा नवीनच धंदा असल्याने तुम्हीच सांगा किती दयावे लागतील" असे सांगितले. तेव्हा संजय ने मला " सिनीअर साहेब का ६,०००/– रूपये, चार एपीआय मिळून १२,०००/–रूपये, चार बिट मार्शल यांचे ५,०००/–, तीन फोर व्हिलर गाडी यांचे ३,०००/– , आणि मुंकुद, संजय, व संदिप यांचे मिळून ६,०००/– रूपये असे एकुण रूपये ३२,०००/– " दयावे लागतील असे सांगितले नंतर मी तेथून निघून गेलो.

मला लोकसेवक पोलीस कर्मचारी मुकुंद, संदिप, संजय यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १६/०१/२०२० रोजी दुपारी १४:३० वाजताचे सुमारास ला.प्र.विभाग कार्यालय, वरळी येथे जावून लोकसेवक पोलीस कर्मचारी मुकुंद, संदिप, संजय विरुध्द तक्रार केली. पो.नि. चव्हाण व पो.नि. विजय डोके यांनी मी केलेली तक्रार मला माझ्या स्वःहस्ताक्षरात लेखी अर्ज लिहुन देण्यास सांगितला. परंतु माझे उजव्या हातास अपघातामुळे दुखापत झाल्याने मी लिहू शकत नसल्याने मी पो.नि. चव्हाण यांना विनंती केल्यावरून त्यांनी माझा तक्रार अर्ज त्यांचे संगणकावर मी सांगितल्याप्रमाणे हिंदीतून टंकलिखीत करून दिला. त्यावर मी माझा अंगठा लावला. पो.नि. चव्हाण यांनी माझे तक्रारीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. पो.नि. चव्हाण यांनी लागलीच दोन सरकारी पंचाना बोलावुन घेतले. त्यानंतर पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथकाची ओळख करुन दिली. पो.नि. चव्हाण यांनी माझी तक्रार पंचाना सांगीतली व त्यांना माझा दि. १६/०१/२०२० रोजीचा लेखी तक्रार अर्ज वाचण्यास दिला त्यांनी तो वाचला. मी दिलेली तक्रार व अर्जातील तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यावर, दोन्ही पंचानी त्यावर सही केली व समक्ष म्हणुन पो.नि. चव्हाण, यांनी सही करुन सदरचा तक्रार अर्ज स्वत:च्या ताब्यात घेतला.

त्यानंतर पडताळणी/सापळया करीता आवश्यक ती कारवाई पूर्ण करून पो.नि. चव्हाण व पो.नि. डोके यांचेसह मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील काही अंमलदार असे ला.प्र.विभागाचे मोकळया जागेत आलो तेथे पो.नि. चव्हाण यांनी माझी व पंचाची वाहन चालकाशी ओळख करुन दिली. त्यातील एका वाहनामध्ये मी, पो.नि. चव्हाण, पो.नि. डोके, दोन पंच व पो.कर्मचारीसह बसलो. सदर वाहन ला.प्र.विभाग वरळी येथून निघून फाईव्ह गार्डन येथे आलो. पो.नि. चव्हाण यांच्या सुचनेप्रमाणे चालकाने वाहन एडनवाला रोड येथे रस्त्याकडेला थांबवली. पो.नि. चव्हाण यांनी पुन्हा मला व पंचास सुचना दिल्या. पो.नि. चव्हाण यांनी त्यांचेजवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये मायक्रो एस.डी.कार्ड घालुन व ते चालु करुन माझ्या कुर्त्याच्या आतील बनियनला लावले. त्यानंतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पंचक्र. १ श्री. रूद्र

Scanned by CamScanner

दांडेकर यांचेसह धारावी पोलीस ठाणे येथे जावुन पोलीस कर्मचारी मुंकुंद, संदिप, संजय यांची भेट घेण्यास सांगितले.

पो.नि. चव्हाण यांचे सुचनेनुसार मी, पंच क्र.१ रूद्र दांडेकर टॅक्सीने धारावी पोलीस ठाणे येथे गेलो. मी व पंच श्री. दांडेकर पो.ठाणे मध्ये गेल्यावर, मी सिनिअर इन्स्पेक्टरच्या कॅबिनच्या शेजारी असलेल्या कॅबिन मध्ये गेलो. तेथे माझी लोकसेवक पोलीस कर्मचारी संदिप राणे यांची भेट झाली, त्यावेळी तेथे लोकसेवक मुकुंद शिंदे हे आले लोकसेवक संदिप राणे ने ''मला केव्हा पासून धंदा सुरू करणार व कसला धंदा चालू करणार असे विचारले'' मी त्यावर त्यांना बिर्याणी व चिकन, कबाबचा धंदा सुरू करणार आहे असे सांगितले. त्यानंतर कॅबिन मध्ये लोकसेवक संजय तळेकर आले. लोकसेवक संजय तळेकर यांनी मला कधी धंदा सुरू करणार असे विचारले असता, मी त्यांना वीस तारखेपासून धंदा सुरू करणार असे सांगितले. पोलीसांनी मागितलेली रक्कम रू.३२०००/– जास्त होत असल्याने सदरची रक्कम कमी करण्याची विनंती केली. तेव्हा लोकसेवक संदिप राणे यांनी सांगितले की, पहिले सिनिअर साहेबांना दयावे लागतील. मी त्यांना एक रक्कम सांगण्यास सांगितले व दुसऱ्या दिवशी घेवून येतो असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक संदिप राणे यांनी बत्तीस हजारामध्ये दहा टक्के कमी रक्कम देण्यास सांगितले. त्यावर लोकसेवक संदिप राणे यांनी पचवीस टक्के डिस्काऊंट देवून चोवीस हजार व हजार रूपये दारू पिण्यासाठी म्हणजे रू २५,०००/– हजार देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच पोलीस ठाणे बाहेर येवून टॅक्सी पकडून परत पोलीस वाहनांकडे आलो व घडलेली हकिगत सांगीतली. पो.नि. चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन सभांषण ऐकले. पुढील कारवाई दिनांक १७/०१/२०२० रोजी करण्यात येईल असे पो.नि. चव्हाण यांनी सांगीतले व आम्ही सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात परत आलो. तेथे झालेल्या कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

पो.नि. चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे मी दिनांक १७/०१/२०२० रोजी दुपारी १२.३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात आलो. मी, लोकसेवक मुंकुद शिंदे, संजय तळेकर, संदीप राणे यांनी मागणी केलेल्या लाचेची रू. २५,०००/– इतकी रक्कम आणल्याचे पो.नि. चव्हाण यांना सांगितले. पो.नि. चव्हाण यांनी मी दिलेल्या २५,०००/– रु.च्या (भारतीय चलनी रू.५००/– दराच्या २८ नोटा व रू.२००/– दराच्या ५५ नोटा) नोटांचे झेरॉक्स काढुन घेतल्या. सदरची रक्कम पो.नि. चव्हाण यांनी चालक भोसले यांचेकडे देवुन त्यास अन्थ्रासिन पावडर लावण्यास सांगितले. पो.नि. चव्हाण यांच्या सुचनेवरून पोलीस वाहनाचे चालक पो.ना.चा. भोसले यांनी मला व पंचाना लाप्रवि कार्यालयातच अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजाऊन सांगितले व मी दिलेल्या २५,०००/– रुपयाच्या नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावली व त्यांनी सदरची ॲन्थ्रासिन पावडर लावलेली रक्कम मी परिधान केलेल्या सदऱ्याच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवली.

.त्यानंतर आवश्यक ती कारवाई पूर्ण करून मी, पंच व सापळा पथक असे पोलीस वाहनाने सर पोचखनवाला रोड येथून सी लिंक मार्गे सायन हॉस्पीटलच्या आतील रोडवर आलो.

पो.नि. चव्हाण यांचे सूचनेनुसार मी लोकसेवक राणे यांना फोनवर संपर्क केला. त्यावेळी त्यांनी ते बाहेर असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी विनंती केल्यावरून मी व पंच क्र.१ दांडेकर धारावी पो.ठाणेस जावून लोकसेवकाची भेट घेण्याचे ठरले त्याप्रमाणे पो.नि. चव्हाण यांनी सर्व सापळा पथकाला योग्य त्या सूचना दिल्या व त्यानंतर त्यांनी माझ्या बनीयनला रेकॉर्डर लावला व तो चालू करुन, आम्हाला धारावी पो.ठाणे येथे जावून लोकसेवकाची भेट घेण्यास सांगीतले व लोकसेवकाने मागणी केल्यास त्यांना ॲन्थ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यास सांगून रक्कम दिल्या नंतर मला ठरवून दिलेला पुर्वनियोजित इशारा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पंचासह धारावी पोलीस ठाणेस गेलो व माझे मागून सापळा पथकाचे अधिकारी व अंमलदार हे देखील धारावी पोलीस ठाणेच्या बाहेर थोडया थोडया अंतरावर लक्ष ठेवून थांबून राहीले. मी धारावी पोलीस ठाणेस गेलो असता, तेथे माझी, लोकसेवक श्री. संदिप राणे यांच्याशी भेट झाली



Scanned by CamScanner

दिनांक १८/०१/२०२० रोजीचा फिर्यादी श्री. अब्दुल साबीर अब्दुल हकीम शाह यांचा जबाब पुढे चालू

असता, मी राणे यांना पैसे आणल्याचे सांगितले तेव्हा राणे यांनी मला सदरचे पैसे पोलीस ठाणे समोरील केकच्या दुकानामधील इसमाकडे देण्यास सांगितले व श्री. राणे हे त्यांचे कामाकरीता बाहेर निघून गेले त्यानंतर माझी वपोनि कार्यालय कक्षाच्या बाजुच्या कक्षातील लोकसेवक मुकुंद शिंदे यांची भेट झाली व पैसे आणल्याबाबत त्यांना सांगितले. त्यावेळी तेथे लोकसेवक श्री. संजय तळेकर हे हजर होते त्यांनी मला पोलीस ठाणे समोरील चहा टपरीजवळ थांबण्यास सांगून फोन करतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी चहा टपरीजवळ जावून थांबलो परंतु बराचवेळ फोन न आल्याने मी माझे मोबाईलवरून लोकसेवक तळेकर यांना फोन केला असता, त्यांनी राणेनी सांगितल्याप्रमाणे पैसे केकच्या दुकानातील इसमाकडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी चहा टपरीजवळील केक च्या दुकानात गेलो व तेथील इसमास त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी स्वतःचे नाव प्रतिक असल्याचे सांगून राणेंनी सांगितलेले पैसे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे जवळील अॅन्थ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू.२५,०००/– माझे डाव्या हाताने सदऱ्याच्या डाव्या खिशातून काढून श्री. प्रतिक यांचे समोर केली असता, त्यांनी सदरची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून ती त्यांचे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी दुकानाच्या बाहेर येवून माझे मोबाईलवरून रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजित इशाऱ्याचा संदेश सापळा पथकातील अधिकारी यांना पाठविला. त्यानंतर पोलीस निरीक्षक चव्हाण व सापळा पथक यांनी केक दुकानामध्ये येवून माझेकडून लाचेची रक्कम स्विकारणाऱ्या प्रतिक यास अटकावले. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी माझे शर्टाच्या आत बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. प्रतिक यांचेकडून लाचेची रक्कम पंच क्र. २ दाभाडे यांचे मार्फत हस्तगत केली. त्यानंतर मी, पोलीस निरीक्षक चव्हाण यांना धारावी पोलीस ठाणेस असलेल्या लोकसेवकांची माहिती दिली. सापळा अधिकारी व अंमलदार यांनी नमूद लोकसेवक मुकुंद शिंदे व संजय तळेकर यांना स्वतःचे ताब्यात घेतले. परंतु लोकसेवक संदिप राणे हे मिळून आले नाहीत. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी तात्काळ दोन्ही पोलीस वाहनांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्यानंतर पोलीस ठाण्यातील एका रूम मध्ये पंच क्र.२ वगळून इतर सर्वांचे अल्ट्राव्हायलेट दिव्याखाली तपासणी करण्यात आली. पुढील सापळा कारवाई पचंनाम्याकरीता ला.प्र.विभाग कार्यालय वरळी, मुंबई येथे आलो. तेथे पुढील सापळा कारवाई करण्यात आली.

धारावी पोलीस ठाणेतील लोकसेवक पोलीस कर्मचारी मुंकुंद शिंदे, संजय तळेकर, संदीप राणे व खाजगी इसम प्रतिक यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या–घेण्याचे व्यवहार नाहीत.

तरी मला बिर्याणी, पुलाव, कबाब ची गाडी लावण्याकरीता व त्यावर कायदेशीर कारवाई न करण्याकरीता माझ्याकडून रू. २५,०००/– ची लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम खाजगी इसमामार्फत स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर कारवाई होण्याकरीता फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत करुन तो मला हिंदीतून समजावून सांगितला तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे. माझा अपघात झाल्याने उजवा हात फ्रॅक्चर आहे त्यामुळे मला सही करता येत नाही म्हणून मी माझे डाव्या हाताचा अंगठा उमटवित आहे.

समक्ष

( शैलेंद्र चव्हाण )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.





Scanned by CamScanner